| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | २४.०३.२०२१ |
| नोंदणी तारीख | २४.०३.२०२१ |
| निकाल तारीख | ०५.०५.२०२६ |
| कालावधी | **०५ वर्षे ०१ महिने ११ दिवस** |

**भाग अ***
**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४(१)]**

| | | |
|---|---|---|
| | | **निशाणी क्र.–१६/ब** |
| **सिरोंचा येथील प्रथमवर्ग न्यादंडाधिकारी, सिरोंचा, यांच्या न्यायालयात,**<br>पिठासिन अधिकारी : उन्मेश बा. श्रीराम | | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र.**०४/२०२१**, **सिरोंचा** पोलीस ठाणे | |
| न्यायनिर्णयाची तारीख | **०५.०५.२०२६** | |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ३४/२०२१**<br>**CNR- MHGA08-000102-2021** | |
| तक्रारकर्ता/अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत/द्वारा पोलीस ठाणे अधिकारी, सिरोंचा पोलीस ठाणे<br>(फिर्यादी- म.ना.पो.शि. चंपाताई जिवन कामतकर) | |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. कृष्णा व्ही. तोकलवार,**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) | |
| आरोपी | | 1. **तिरुपती रत्नया गोदारी,**<br>वय ५० वर्षे, व्यवसाय- शेती,<br>2. **तिरुपतक्का तिरुपती गोदारी,**<br>वय- ४५ वर्षे, व्यवसाय- घरकाम,<br>दोघे राहणार- अमरावती,<br>तालुका- सिरोंचा, जिल्हा - गडचिरोली. |

| | | |
|---|---|---|
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | | **श्री. तिरुपती जे. कोंडागोर्ला**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४(२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०२.०१.२०२१ |
| पहिल्या खबरीची तारीख | ०२.०१.२०२१ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २३.०३.२०२१ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | १८.०१.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १०.११.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | - |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनवर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **तिरुपती रत्नया गोदारी** | _ | २४ मार्च २०२१ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(फ) आणि ८३ प्रमाणे दंडनिय | **निर्दोष** | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | **तिरुपतक्का तिरुपती गोदारी** | _ | २४ मार्च २०२१ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(फ) आणि ८३ प्रमाणे दंडनिय | **निर्दोष** | – | – |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४(३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्षः**

| **क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | चंपाताई जिवन कामतकर **(निशाणी क्र.१६)** | फिर्यादी |
| सा.क्र.२ | रविंद्र प्रभाकर शेरकी **(निशाणी क्र.१६)** | पंच साक्षीदार |
| सा.क्र.३ | चिन्नना बालया भंडारी **(निशाणी क्र.१६)** | पंच साक्षीदार |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्षः**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–२२**/स.सा.क्र.१ | फिर्याद |
| २. | निशाणी **पी–२३**/स.सा.क्र.१ | छापील एफ.आय.आर. |
| ३. | निशाणी **पी–२५**/स.सा.क्र.२ | घटनास्थळ घरझडती जप्ती पंचनामा |
| ४. | निशाणी **पी–२६**/स.सा.क्र.२ | गुन्ह्याचा तपशील नमुना |
| ५. | निशाणी **पी–२७**/स.सा.क्र.२ | मालमत्ता शोध व जप्ती पंचनामा |

**ड. महत्वाच्या वस्तु:**

| **अ.क्र.** | **महत्वाची वस्तु क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | - | - |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

# न्यायनिर्णय

[आज दिनांक **०५ मे २०२६** रोजी उद्घोषित]

प्रस्तुत प्रकरण तब्बल पाच वर्षांपेक्षा जास्त कालावधी खर्ची पडल्यानंतर आज रोजी संपुष्टात येत आहे. प्रस्तुत प्रकरणातील आरोपींवर त्यांनी दारुबंदी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करुन मद्यसाठा बाळगल्याचा आरोप आहे.

2. दिनांक ०२/०१/२०२१ रोजी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे फिर्यादी महिला पोलीस नाईक, चंपाताई कामतकर व इतर पोलीस कर्मचा-यांनी आरोपी क्र.१ व २ च्या राहत्या घरी छापा टाकला होता. त्यावेळी आरोपी क्र.१ व २ यांच्या ताब्यात राहत्या घराच्या सांदवडीत जमिनीत पुरुन ठेवलेले ११ निळ्या रंगाच्या प्रत्येकी १०० लिटर मापाचे प्लॅस्टीक ड्रममध्ये एकुण ११०० लिटर दारु गाळण्याकरीता वापरण्यात येणारा गुळामोहाचा एकुण ७७,०००/- रुपये किंमतीचा सडवा आढळून आला होता. सदर मुद्देमाल हा छापा पथकाने जप्त केला होता. त्यानंतर उपस्थित पोलीस कर्मचा-यांनी एका शिशीमध्ये सडव्याचा नमुना वेगळा राखुन, त्याला फिर्यादी व पंचाच्या सहीनिशी मोहोरबंद केले होते. त्यानंतर पोलीस नाईक,

चंपाताई कामतकर यांनी आरोपीं विरुध्द फिर्याद दिली. त्या खबरी आधारे गुन्हा रजिस्टर नंबर ०४/२०२१, सिरोंचा पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आला. दिनांक २३/०३/२०२१ रोजी तपासी अधिकारी बाळकृष्ण एन. बोरघरे यांनी प्रस्तुत प्रकरणात न्यायालयात अंतिम अहवाल सादर केला होता.

3. दिनांक ०२/०१/२०२१ रोजी माझे पुर्व सुविज्ञ पिठासीन अधिकारी यांनी आरोपींना समजेल अशा भाषेत गुन्ह्याचा आशय समजावून सांगितला. सदर प्रतिकथन निशाणी क्र.१६ खाली दाखल आहे. आरोपींनी गुन्हे कबुल केले नाहीत व संपरिक्षेला सामोरे जाण्याचा पर्याय निवडला. अभियोग पक्षातर्फे सादर असलेला तोंडी व लेखी पुरावा ह्या न्यायनिर्णयाच्या परिशिष्टात नमुद आहे. आरोपीचा बचाव पुर्ण निर्दोषत्वाचा आहे.

4. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे एकुण ०३ साक्षीदार तपासण्यात आले. दिनांक १२/०२/२०२६ रोजी नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर आरोपी क्र.१ व २ चे स्वतंत्र स्पष्टीकरणात्मक निवेदन निशाणी क्र.१६ खाली नोंदविण्यात आले. त्यात देखील आरोपींनी ते पुर्णपणे निर्दोष असल्याचा बचाव घेतला.

5. त्यानंतर, मी अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. कृष्णा व्ही. तोकलवार यांचा व आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री. तिरुपती कोंडागोर्ला यांचा युक्तीवाद ऐकला.

6. या पार्श्वभूमीवर, आरोपींवरील आरोप व संबंधित गुन्हे त्यांनी केल्याचे सिध्द करण्यात अभियोग पक्ष यशस्वी झाला किंवा नाही हे ठरविण्यासाठी खाली नमूद प्रश्नांबाबत निर्णय नोंदविले आहेत. हे निर्णय

उपलब्ध पुराव्याचे सुयोग्य परिनिरीक्षण केल्यावर नोंदविले असुन त्यामागची कारणमीमांसा त्यापुढे शब्दबध्द केली आहे. ते विचाराधीन प्रश्न, त्याबाबतचे निर्णय व कारणमीमांसा येणेप्रमाणे-

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निर्णय |
|---|---|---|
| १ | दि.०२/०१/२०२१ रोजी आरोपींनी संगनमत करुन आपले घरी ११०० लिटर दारु गाळण्याकरीता वापरण्यात येणारा गुळामोहाचा सडवा अवैद्यरित्या, विनापरवाना व बेकायदेशीर रित्या बाळगुन दारु गाळताना मिळून आले आणि त्याद्वारे आरोपी क्र.१ व २ यांनी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(फ) अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिद्ध केले आहे काय? | ...**नाही**... |
| २ | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी क्र.१ व २ यांनी संगनमताने आपले घरी उपरोक्त नमुद ११०० लिटर गुळामोहाचा सडवा कोणत्याही परवान्याविना बाळगले व महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ८३ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिद्ध केले आहे काय? | ...**नाही**... |
| ३ | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**विचाराधीन प्रश्न क्रमांक १ व २ च्या अनुषंगाने :-**

7. संभाव्य पुनरावृत्ती टाळावी व संक्षिप्तता साधावी म्हणून वरील दोन्ही विचाराधीन प्रश्नांची एकत्रितपणे चर्चा करणे संयुक्तिक आहे.

8. अभियोग पक्षाने केलेले आरोपी सिध्द करण्याची संपुर्ण जबाबदारी त्यांची असते. सदर आरोपी सिध्द करताना अभियोग पक्षाने प्रकरणातील गुन्ह्याचे आवश्यक घटक प्रस्थापित करणारे तथ्य पुराव्यातून सिध्द करणे गरजेचे असते. अशा पुराव्याची सांगड घालताना त्यातून

कोणताही संशय निर्माण होणार नाही याची काळजी घेण्याची जबाबदारी देखील अभियोग पक्षाची असते. प्रकरणात जर निर्माण होणारा संशय वाजवी असेल तर तो निश्चितच बचाव पक्षाला उपयोगी ठरतो. त्यामुळे उपलब्ध पुराव्याचे बारकाईने परिनिरीक्षण होणे अत्यावश्यक आहे.

9. प्रस्तुत गुन्ह्यात आरोपी विरुध्द केलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला, आरोपी हे मादक द्रव्य अर्थात दारु बनविण्यासाठी लागणारा गुळा मोहाचा सडवा जवळ बाळगून होते व त्यांच्याकडे सदर सडवा बाळगण्याचा/विक्री करण्याचा परवाना नव्हता हे सिध्द करावे लागेल.

10. उपलब्ध पुराव्याचा विचार करता नमुद वेळी आरोपी हे मादक द्रव्य बनविण्यासाठी उपयोगी असणारा गुळामोहाचा सडवा बाळगून होते हे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने एकुण तीन साक्षीदार तपासले. त्यापैकी साक्षीदार क्र.१ नामे चंपाताई जिवन कामतकर (फिर्यादी), साक्षीदार क्र.२ रविंद्र प्रभाकर शेरकी (पंच साक्षीदार) व साक्षीदार क्र.३ नामे चिन्नन्ना बालया भंडारी (पंच साक्षीदार) यांनी त्यांच्या सरतपासात आरोपींच्या घरात गुळामोहाचा एकुण ११०० लिटर सडवा सापडल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदारांनी आरोपींविरुध्द दोष सिध्द होताना आपल्या कथनांवर ठाम असणे व झालेली जप्ती प्रक्रिया कायदेशीर होती हे दर्शविणे आवश्यक आहे. परंतु, प्रस्तुत साक्षीदारांनी आपल्या उलट तपासात काही ठळक बाबी मान्य केल्या. ज्यांचा थेट फायदा आरोपींना होत आहे.

11. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या उलट तपासात हे स्पष्टपणे मान्य केले की, ते आरोपींचा घर क्रमांक सांगु शकत नाहीत. तसेच सांदवडी म्हणजे जेथून गुळामोहाचा सडवा जप्त केला ते

ठिकाण कोणाच्या मालकीचे आहे हे ते सांगु शकत नाहीत. प्रस्तुत साक्षीदारांच्या उलट तपासातील स्पष्टपणे मान्य केलेल्या या बाबींवरुन हे दिसून येते की, ज्या ठिकाणा वरुन गुळामोहाचा सडवा जप्त केला गेला ते ठिकाण आरोपींच्या मालकीचे किंवा कब्जातील आहे याचा कुठलाही पुरावा अभियोग पक्षाने सादर केला नाही किंवा सदर बाब पंचनाम्यात नमुद करण्याची तसदी देखील घेतली गेली नाही. यावरुन जप्त मुद्देमाल हा आरोपींच्याच ताब्यातुन जप्त केला किंवा कसे याबाबत संशय निर्माण होतो.

12. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.१ यांनी फिर्याद ओळखून त्यातील मजकूर मान्य केला असला तरी वर नमुद केल्याप्रमाणे मुद्देमाल हा आरोपींच्याच ताब्यातून किंवा त्यांच्या मालकीच्या किंवा कब्जाच्या घरातून जप्त केला आहे हे सिध्द झाले नसल्याने, सदर फिर्याद अभियोग पक्षास आरोपीस शिक्षा देण्याइतपत पुरेशी नाही.

13. साक्षीदार क्र.२ व ३ हे प्रस्तुत प्रकरणातील पंच साक्षीदार आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात आरोपीच्या घरामध्ये काही मिळुन आले नाही. परंतु, त्यांच्या सांदवडीमध्ये ११ निळ्या रंगाच्या ड्रममध्ये गुळामोहाचा सडवा सापडल्याचे कथन केले आहे. परंतु, प्रस्तुत साक्षीदार पंच साक्षीदार असुन देखील नेमका किती सडवा जप्त केला याबाबतचे कथन केले नाही. जरी प्रस्तुत साक्षीदार नि.क्र.२५ ते २७ खाली पंचनामे सिध्द करीत असले तरी ते त्यांच्या सरतपासातच किती लिटर सडवा सापडला हे कथन करत नसल्याने, जप्ती कार्यवाहीवर प्रश्नचिन्ह निर्माण होतो.

14. तसेच साक्षीदार क्र.२ हा त्याच्या उलट तपासात मान्य करतो की, खेडेगांवामध्ये एकमेकांची सांदवडी ही लागुन असते. घटनेवेळी तो तलाठी होता. मुद्देमाल जप्त झाला ती सांदवडी कोणाची याबाबत त्याने

पडताळणी केली नाही. तसेच सदर भुमापन क्रमांकाचा मालक कोण आहे, याबाबत पंचनाम्यामध्ये नमुद नाही. प्रस्तुत साक्षीदारांच्या या मान्य बाबीवरुन आरोपींच्या ताब्यातुन मुद्देमाल जप्त झाला ती जागा आरोपीच्या मालकीची असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे, मुद्देमाल आरोपींच्याच ताब्यातुन जप्त झाला हे सिध्द होत नाही. तसेच पंचनाम्यात जप्ती कार्यवाही झाली त्याबाबतच्या घटनास्थळाचा नेमका उल्लेख न करणे ही पंचनाम्यातील मोठी त्रृटी आहे.

15. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने तपासी अधिकारी यांना तपासले नाही. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणातील तपासाची योग्य दिशा व क्रम न्यायालयासमोर सिध्द झाला नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषकाचा अहवाल नि.क्र.२८ खाली दाखल केला आहे. परंतु, जरी जप्त मुद्देमाल हा मादक द्रव्य असणे असे दिसून येत असले तरी ते आरोपींच्या ताब्यातून जप्त झाले हे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. त्याचप्रमाणे आरोपींकडे मादक द्रव्य बनविण्यासाठी आवश्यक असणा–या वस्तुंचा साठा करण्याची परवानगी नव्हती हे सिध्द करण्यासाठी तपासी अधिका–याने कोणताही पुरावा गोळा केलेला नाही.

16. वर नमुद बाबींमुळे हे स्पष्ट होते आहे की, दारुबंदी अधिनियमाच्या संबंधित कलमान्वये दंडनिय गुन्हे या आरोपींनी केले हे प्रस्थापित करण्यात अभियोग पक्षाला अपयश आले आहे. त्यामुळेच या विचाराधीन प्रश्न क्रमांक १ आणि २ बाबत **'नाही'** असा निर्णय उपरोक्त चर्चेनुसार नोंदविण्यात येत आहे व त्यानुसार प्रश्न क्रमांक ३ करीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

:::: **आ दे श** ::::

1. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २५५(१) आणि महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ११५ च्या एकत्रित वाचनान्वये आरोपी क्र.१ तिरुपती रत्नया गोदारी, आरोपी क्र.२ तिरुपतअक्का तिरुपती गोदारी यांनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(फ) आणि ८३ नुसार दंडनिय गुन्हे केल्याचे सिध्द न झाल्याने त्यांना या गुन्ह्यांतुन **'निर्दोष'** मुक्त करण्यात येत आहे.

2. आरोपींचे अस्तित्वांत असलेले सर्व मुचलके, बंधपत्रे आणि जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत. मात्र, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७(अ) नुसार प्रत्येक आरोपीने नव्याने रुपये २५,०००/- चा वैयक्तिक मुचलका देऊन मा. अपिलीय न्यायालयासमोरील त्याची हजेरी सुनिश्चित करावी. हा मुचलका पुढील सहा महिन्यांसाठी वैध राहील.

3. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४५२ नुसार असे आदेशित करण्यात येते की, दोषारोपपत्रामध्ये नमुद केलेला ११०० लिटर गुळामोहाचा सडवा यापूर्वीच नाश केला असल्यामुळे त्याबाबत वेगळा आदेश नाही.

4. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने **रंजना शांतीलाल सुर्यवंशी वि. जयप्रकाश तुळशीराम गुप्ता** या प्रकरणात दिलेल्या निर्णयातील मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन, या न्यायनिर्णयाची एक सत्यप्रत मा. जिल्हा दंडाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे पाठविण्यात यावी.

*सदरील स्वहस्ते मुद्रित केलेला न्यायनिर्णय आज दि.०५.०५.२०२६ रोजी १२.२० वाजता आरोपीच्या उपस्थितीत उद्घोषित केला.*

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UNMESH BALU SHRIRAM
Date: 2026.05.05 19:31:47 +0530

**(उन्मेश बा. श्रीराम)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिरोंचा
(न्यायिक अधिकारी संकेतांक क्रमांक-MH03286).

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | विठ्ठल विश्वांभर मिठ्ठेवाड<br>लघुलेखक (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी व फौजदारी न्यायालय,<br>सिरोंचा. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०५/०५/२०२६. |
| मा.पिठासीन अधिकारी यांनी न्यायनिर्ण-<br>यावर सही केल्याची तारीख | : | ०५/०५/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०५/०५/२०२६. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VITHAL VISHWAMBHAR MITHEWAD
Date: 2026.05.05 19:33:43 +0530

(विठ्ठल विश्वांभर मिठ्ठेवाड)
लघुलेखक (श्रेणी-३)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सिरोंचा.